मफुकृवि/विस्तार प्रकाशन क्र. २१९५/२०१८

सुवर्ण महोत्सवी वर्ष-२०१८

सन २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणे

# किसान आधार संमेलन - २०१८

१५ ते १८ ऑक्टोबर, २०१८

स्थळ : महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## कृषि प्रदर्शन

## पीक प्रात्यक्षिके

## शेतकरी - शास्त्रज्ञ चर्चासत्र

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
जि. अहमदनगर

कृषि विभाग, महाराष्ट्र शासन आणि आत्मा, अहमदनगर
यांच्या सहकार्याने

## महात्मा फुले कृषि विद्यापीठ : दृष्टीक्षेप

महाराष्ट्रातील पहिले कृषि विद्यापीठ म्हणून सन १९६८ साली महात्मा फुले कृषि विद्यापीठाची राहुरी येथे स्थापना झाली. विद्यापीठाच्या अतुलनिय कार्यामुळे राज्यातील नव्हेतर पुर्ण देशातील कृषि विद्यापीठांना एक दिपस्तंभ ठरत आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या अभुर्तपुर्व कार्यामुळे विद्यापीठास आजपर्यंत सरदार वल्लभभाई पटेल सर्वोकृष्ट कृषि विद्यापीठ पुरस्कार (२००२), देशातील उत्कृष्ट संस्था म्हणुन १०० कोटी रुपयांचे विशेष पारितोषिक (२००८), देशातील सर्वात पंसतीची संस्था (२००९) या सारख्या विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. या विद्यापीठाचे कार्यक्षेत्र पश्चिम महाराष्ट्रातील नंदुरबार, धुळे, जळगांव, नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर या दहा जिल्ह्यात विस्तारलेले आहे.

शेतीशी निगडीत संशोधन करण्यासाठी विद्यापीठ मध्यवर्ती परिसराशिवाय पश्चिम महाराष्ट्रात २८ संशोधन केंद्र आहेत. संशोधनात विद्यापीठाचे योगदान मोलाचे असून गेल्या ४९ वर्षामध्ये अन्नधान्य, फळेफुले, चारापिके यांचे २६२ वाण विकसित केले असून मृद व जलसंधारण, पीक लागवड पध्दती, खते आणि पाणी व्यवस्थापन, रोग व किडींचे नियंत्रण, औजारे, हरितगृहातील शेती, प्रक्रिया, दुग्धशास्त्र इ. या विषयी सखोल संशोधन करुन १४७१ हुन अधिक महत्वपुर्ण शिफारशी प्रसारित करण्यात आल्या आहेत.

या कृषि विद्यापीठांतर्गत एकुण ८ घटक कृषि महाविद्यालय व ६३ विना अनुदानित महाविद्यालये आहेत या महाविद्यालयामध्ये कृषि, उद्यान विद्या, कृषि जैवतंत्रज्ञान, कृषि अभियांत्रिकी, कृषि व्यवसाय व व्यवस्थापन, वानिकी मत्स्यव्यवसाय आणि पशुसंवर्धन हे पदवी अभ्यासक्रम शिकविले जातात. कृषि विद्यापीठात विकसित झालेले तंत्रज्ञान शेतकऱ्यापर्यंत परिणामकारकरित्या पोहचविण्यासाठी विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालनालयांतर्गत ४ विभागीय विस्तार केंद्र, ५ जिल्हा विस्तार केंद्र आणि १६ कृषि विज्ञान केंद्रे कार्यरत आहेत.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ आणि कृषि विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुत विद्यमाने महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे १५ ते १८ ऑक्टोबर या कालावधीत भव्य किसान आधार संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या किसान आधार संमेलनात शेतकऱ्यांसाठी कृषि प्रदर्शन, विविध पिकांचे प्रात्यक्षिके, पशु प्रदर्शन आणि विविध कृषि विषयांवर व्याख्याणे व चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले आहे.

## किसान आधार संमेलन २०१८ – ठळक वैशिष्ट्ये

### १५ ते १८ ऑक्टोबर, २०१८

### पीक प्रात्यक्षिके

या किसान आधार संमेलनातील पीक प्रात्यक्षिकांमध्ये तेलबिया, कडधान्य, तृणधान्य, चारा आणि नगदी पिकांमधील विविध ३० पिकांचे १०१ वाण, १४ भाजीपाला पिकांचे २८ वाणांचे प्रात्यक्षिके बघता येणार आहे. ही प्रात्यक्षिके एकूण १०० एकर क्षेत्रावर आयोजित केलेली आहे.

#### पीक प्रात्यक्षिकांचे ठळक वैशिष्ट्ये



एकूण १०० एकर क्षेत्र



पीक प्रात्यक्षिकांमध्ये
एकूण ४४ पिकांचे १३० वाण



गाय, म्हैस, शेळी, मेंढी, कुक्कुटपालनाचे
देशी व सुधारीत जाती



एकात्मिक शेती पद्धती मॉडेल



कृषि अवजारे



आधुनिक सिंचन प्रणाली, निचरा पद्धती



मधुमक्षिकापालन, गांडुळ खते, जैविक खते



ड्रॅगन फळ लागवड



शेडनेटमधील
फूलशेती आणि भाजीपाला

## कृषि प्रदर्शन

### कृषि प्रदर्शनाचे ठळक वैशिष्ट्ये

- एकूण १०० दालने
- आधुनिक कृषि तंत्रज्ञानाची दालने
- कृषि निविष्ठा
- शासकीय संस्था आणि खाजगी कंपन्यांची दालने
- कृषिपुरक उद्योग संदर्भातील दालने
- वित्त पुरवठा (बँक) दालने
- बियाणे, रोपे, फुलशेती, प्रक्रिया उद्योग, कौशल्य विकास, प्रगतशील शेतकऱ्यांचे उत्पादन इ. दालने
- पशु-पक्षी प्रदर्शन













## शेतकरी-शास्त्रज्ञ चर्चासत्र

या प्रसंगी प्रत्येक दिवशी विविध विषयांवर कृषि शास्त्रज्ञांचे आणि प्रगतशील शेतकऱ्यांचे व्याख्याणे आणि चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आलेले आहे.














# किसान आधार संमेलन - २०१८

## कृषि प्रदर्शन आराखडा




संपर्क : **डॉ. किरण कोकाटे**
संचालक, विस्तार शिक्षण आणि
अध्यक्ष, प्रदर्शन व प्रसिध्दी समिती
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जि. अहमदनगर
फोन नं. : ०२४२६-२४३२३०
email : kasmpkv2018@gmail.com

### स्टॉल बुकींगसाठी संपर्क

डॉ. मिलींद अहिरे : ७५८८५१३३४१
डॉ. आनंद सोळंके : ९४२२९२१८१६
डॉ. पंडित खर्डे : ८२७५०३३८२२
डॉ. सचिन सदाफळ : ७५८८००५२९१
डॉ. भगवान देशमुख : ७५८८०७८४६७
डॉ. मनोहर धाडवाड : ९४२२६१४०३२